(Navgan Shikshan Sanstha Rajuri's)

# VASANTDADA PATIL ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, PATODA. TQ. PATODA. DIST. BEED. MAHARASHTRA

Reaccredited 'B' grade by NAAC
ISO 9001:2015 certified

PRINCIPAL
**DR. ABASAHEB HANGE**
Cell No. 9423715583

SECRETARY
**DR. BHARATBHUSHAN KSHIRSAGAR**

Phone: Office- (02444) 243049, Website: www.pvpcollegepatoda.org, E-mail: pvp_patoda@rediffmail.com/pvppatoda@gmail.com

VPCP/2023-2024 / Date: 18 / 09 / 2023

प्रति,
**मा. संचालक,**
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

**मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन अमृत महोत्सव अभियान कार्यक्रमाचा अहवाल**

नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. १७ सप्टेंबर २०२३ रोजी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन अमृत महोत्सव अभियान कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. प्रमुख अतिथी म्हणून कर्नल कल्याणराव डोरले, सुप्रसिद्ध उद्योगपती व माजी सैनिक वसंतसेठ गुगळे उपस्थित होते. कार्यक्रमात सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल व स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण करण्यात आले. तद्नंतर ध्वजारोहण संपन्न झाले. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. गणेश पाचकोरे, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. मनोजकुमार प्रकाश, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. बबन मोहिते, रासेयो समिती सदस्य डॉ. प्रशांत पाटील, प्रा. मनिषा गाढवे यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या वाङ्मय, वाणिज्य व विज्ञान मंडळाअंतर्गत विविध विभागांच्या भित्तिपत्रकांचे प्रकाशन करण्यात आले. यात प्रामुख्याने

मराठी विभागाच्या वतीने 'मृदगंध: डॉ. दीपा क्षीरसागर विशेषांक', इतिहास विभागाच्या वतीने 'असे झुंजलो आम्ही: मुक्तिसंग्राम विशेषांक', समाजोत्पादक कक्षाच्या 'मानवमार्ग: डॉ. सुहासिनी इर्लेकर  विशेषांक' या भित्तिपत्रकांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. भौतिकशास्त्र विभागामार्फत भित्तिपत्रक स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत एकूण तेवीस विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम व प्रमाणपत्र स्वरूपात पारितोषिके वितरित करण्यात आली.
याप्रसंगी कर्नल कल्याणराव डोरले यांनी उपस्थितांना मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्याविषयी ऐतिहासिक माहिती देताना मुक्तिसंग्राम लढ्यात सहभागी झालेल्या स्वातंत्र्य सैनिकांची चळवळ व हुतात्म्यांचे बलिदान याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागाचे डॉ. कुशाबा साळुंके, प्रा. जयंत साठे यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. दिलीप गिऱ्हे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

रासेयो कार्यक्रमाधिकारी

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
व्हि.पी महाविद्यालय,
पाटोदा ता.पाटोदा.जि.बीड.

प्राचार्य

Principal
Vasantdada Patil College,
Patoda, Dist. Beed.

# छायाचित्रे


GPS Map Camera
Patoda, Maharashtra, India
Bazar tad, QFVG+9VG, Patoda, Maharashtra 414204, India
Lat 18.793297°
Long 75.477228°
17/09/23 07:50 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Patoda, Maharashtra, India
Bazar tad, QFVG+9VG, Patoda, Maharashtra 414204, India
Lat 18.793297°
Long 75.477228°
17/09/23 07:53 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Patoda, Maharashtra, India
Bazar tad, QFVG+9VG, Patoda, Maharashtra 414204, India
Lat 18.793297°
Long 75.477228°
17/09/23 07:53 AM GMT +05:30
Google